‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड पंचायत राचसंस्थेतील मातंग समाजाचा राजकारणातील सहभागः विशेष संदर्भ लातूर जिल्हा’’

सन 2000 ते 2015

राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्रारुप आराखडा ‘‘पंचायत राजसंस्थेतील मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग : विशेष संदर्भ लातूर जिल्हा’’

संशोधक

प्रा. डावरे वसंत रंगनाथ

कै.शंकरराव गुट्टे वरिष्ठ महाविद्यालय, धर्मापूरी

ता.परळी (वै.) जि. बीड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.रमेश रा. बैनवाड

नूतन महाविद्यालय, सेलू

ता.सेलू जि. परभणी

प्रस्तावना :-

21 व्या शतकाचे आज दूसरे शतक चालू असताना भारतीय जाती व्यवस्थेमध्ये ‘मातंग’ समाज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका जाती समूहाचे संशोधन करणे आहे. हे संशोधन यामुळे करावे लागत आहे की, स्वातंत्र्य मिळवून 68 वर्ष होत असताना हा समाज कुठे आहे? कसा आहे? याची राजकारणातील स्थिती कशी आहे? प्रगतीच्या टप्प्यावर आहे की जिथे आहे तिथेच आहे? प्रगतीच्या टप्प्यावर असेल तर त्यांनी ही प्रगती कशी केली? जिथे आहे तेथेच असेल तर तो आहे त्या ठिकाणीच का आहे? याची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक किंमत कशी आहे? याचा स्वतंत्रपणे आणि निरपेक्ष पद्धतीने विचार करणे गरजेचे आहे.

वैज्ञानिक पद्धतीने जग लहान झाले असताना मातंग समाज कुठे आहे? फुले-आंबेडकरानी, शाहू विचारधारेपासून दूर आहे की त्यांच्या विचारांचा अंगीकार करुन सर्वांगीण विकास साधला आहे? लोकशाही मूल्ये या समाजात रुजली आहेत का? समाज अनुसूचित जाती या प्रवर्गातून आरक्षणाचा उपयोग या समाजाने घेतला आहे का? घेतला तर त्यांचा विकास झाला आहे का? जर घेतला नसेल तर का घेता आला नाही यासाठी त्यांना स्वतंत्र आरक्षणाची गरज आहे का? विकास महामंडळाचा फायदा कितपत झाला कि मुठभर लोकांनीच याचा उपभोग घेतला? या समाजाला नेतृत्व आहे की, नेतृत्वाचा अभाव? पंचायत राजसंस्थेत या समाजाने राजकारणात कितपत सहभाग नोंदवला आहे? स्त्री, पुरुष, युवती यांची स्थानिक राजकारणात रुची आहे का? राजकारणापासून दूर असतील तर याची कारणे

काय आहेत? एकंदरीत (वंचित) मातंग समाजाच्या स्थितीचा विचार मातंग समाजाला आणि मातंग समाजावर विकास झाला पाहिजे असे म्हणणाऱ्या प्रत्येकाला करावा लागेल.

'मातंग समाजाचे सामाजिक, राजकीय स्थान शोधायला गेले तर यांना कोणतेही स्थान नसलेला समाज असे म्हणता येईल. आज राज्यात या समाजाची सुमारे 75 लाख लोकसंख्या असून अनुसूचित जातीच्या प्रमाणात दूसरा क्रमांक आहे.' पण राजकीय, शैक्षणिक सुविधा नौकरीमध्ये स्थान हे त्यांच्या संख्येच्या प्रमाणात अतिशय कमी दिसून येते.

आज कोणत्याही समाजाचे भवितव्य ठरवायचे असेल तर त्या त्या समाजाची राजकीय परिस्थिती काय? हे पाहून ठरवावे लागते. याचे कारण स्वतःही अतिशय महत्वाची असून एखादा समाज सत्ताधारी आहे की सत्ताहिन हे पाहिले जाते.

राजकीयदृष्ट्या मातंग समाज आज दोन गटात विभाजीत झाला आहे. पहिला गट अशिक्षित लोकांचा असून तो राजकीय जागृत कमी दिसून येतो. दुसरा गट सुशिक्षितांचा असून हा संघटना/राजकीय पक्षाशी जागृत दिसून येतो. या समाजात अनेक नेते असले तरी सर्व समाजाचा मध्यवर्ती नेता नाही. (प्रत्येक जातीचा एक पुढारी असावा असे मला म्हणायचे नाही) राजकीय सत्ता ही समाजाच्या उद्धाराची गुरुकिल्ली आहे. ती हाती घेण्यासाठी आपण सत्ते असले पाहिजे असे डॉ.आंबेडकरांना वाटते. आंबेडकरवादी राजकीय सुत्र मातंग समाजाने विचारात घेवून राजकीय सत्तेत सहभागी होण्यासाठी मातंग जनतेला एकत्रित करुन सामाजिक राजकारणात उतरवणे याशिवाय दूसरा म्राग वाटत नाही.

मातंग समाजाची शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक धर्मातील स्थान सुधारणा झालेली दिसून येत नाही.

मातंग समाजाला एक इतिहास आहे. महात्मा फुले यांनी सन 1953 ला मांग (मातंग) महारांच्या मुला-मुलींसाठी शाळा काढली. या शाळेवर गणु शिवाजी मांग हे शिक्षक इयत्ता तिसरी वर्गावर शिकवत होते. त्या गुरुजींनी 165 वर्षापूर्वी मांग (मातंग) महारांच्या पोरांना घडविले तो मांग आज अज्ञानी आहे. पहिली मुलींची शाळा सावित्रीबाई फुले यांनी काढली. त्या शाळेत मुक्ता साळवे ही मातंग स्त्रीने शिक्षण घेतले. आज मातंग स्त्री शिक्षणापासून मोठ्या प्रमाणात वंचित असलेली दिसून येते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लहूजी उस्तादांनी क्रांतीकारक निर्माण केले. महात्मा फुलेंना, लोकमान्य टिळकांना लहुजी उस्तादानी तालमीचे शिक्षण दिले. आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडकेसारखे इंग्रजी राजवटीला त्रासून सोडणारे क्रांतीकारक निर्माण केले. शाहीरीच्या व साहित्याच्या जोरावर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय जागृती घडवून आणली. या क्रांतीसुर्याचा मातंग आज लाचार का? या सर्व बाबीचे विवेचन करायचे असून लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाचा पंचायतराज व्यवस्थेमध्ये राजकीय सहभागाविषयी परीक्षण करावयाचे आहे.

पंचायतराज एक दृष्टीकोण :-

भारताची ओळख जगातील पातळीवरील खेड्याचे राष्ट्र अशी आहे. राष्ट्रपीता महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय प्रजासत्ताकाबाबत आपली वैचारिक भूमिका मांडत असताना असे म्हंटले होते की, ‘‘देशाच्या प्रचलित परंपरा व उपलब्ध परीस्थितीनुसार सत्ता खेड्यात म्हणजेच गावात विभागली पाहिजे. यालाच गांधीजींचे ‘रामराज्य’ आदर्शराज्य किंवा ग्रामस्वराज्य असे म्हणतात.

साधारणतः जगाच्या पाठीवर दोन प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. एक शहरी दोन ग्रामीण भारतातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेला 'पंचायतराज' म्हणतात. राज्यस्तरावरील ग्रामीण विकास मंत्रालयाच्या देखरेख व नियंत्रणासाठी या संस्था कार्य करतात. 1993 च्या 73 व्या घटना दुरुस्ती नंतर या संस्थांना घटनात्मक दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे पूर्वीपेक्षा या संस्था अधिकार संपन्न बनलेल्या आहेत. शाब्दिकदृष्ट्या पंचायतराज शब्द हिंदी भाषेचे दोन शब्द पंचायत व राज यातून बनलेले आहे. याचा अर्थ पाच व्यक्ती प्रतिनिधीचे शासन असा होतो. या त्रिस्तरीय राजप्रणालीत असलेले तीन स्तर म्हणजे 1. ग्राम पंचायत 2. तालूका पंचायत समिती 3. जिल्हा परिषद या तीन संस्थाच्या आकृतीबंधाला पंचायतराज असे नाव पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दिले. पण देशात सर्वत्रच रचनात्मक व कार्यात्मक दृष्ट्या समान संस्था झालेल्या नाहीत. यामध्ये 1993 च्या 73 व्या घटना दुरुस्तीमुळे समानता आली. असे म्हणता येते की, देशात निर्माण करण्यात आलेले हे सत्तेचे विकेंद्रिकरण म्हणजेच पंचायतराज ही आधुनिक संकल्पना गांधीजींच्या विचाराची देण असून मातंग समाजाने पंचायतराज व्यवस्थेच्या राजकारणात सहभाग नोंदवला आहे का? हे पाहणे गरजेचे वाटते.

अभ्यासाचे क्षेत्र :

''शास्त्रातील संशोधनापेक्षा सामाजिक शास्त्रातील संशोधन अवघड असते'' असे अल्बर्ट आईनस्टाईन यांनी म्हंटले आहे. सामाजिक शास्त्रातील संशोधन करताना निश्चित मर्यादा पडतात. संशोधन सुक्ष्म व वस्तूनिष्ठ होण्याकरीता अभ्यासक्षेत्र मर्यादीत असावी यासाठी लातूर जिल्ह्याची निवड केलेली आहे.

लातूर जिल्हा हा शैक्षणिकदृष्टीने अग्रेसर आहे. हा विकसनशील जिल्हा असून राजकीयदृष्टीने महत्वाचा आहे. मातंग समाजाची संख्या अधिक असून मी याच जिल्ह्यातील रहिवासी असल्याने या जिल्ह्याची निवड केली आहे.

लातूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7373 चौ.कि.मी. आहे 945 गावे आहेत त्यापैकी 922 वस्ती असलेले व 23 गावे ओसाड आहेत. या जिल्ह्यात 10 पंचायत समितीचा समुहगट आहे. 782 ग्राम पंचायती आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होवून दि. 16/08/1982 रोजी लातूर या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. या नवनिर्मित लातूर जिल्ह्यात पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा अशा पाच तालूक्याचा तसेच बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालूक्यातील रेणापूर सर्कलमधील रेणापूरसह 43 गावांचा समावेश करण्यात आला. 15 ऑगस्ट 1992 रोजी पूर्वीच्या तालूक्याची पुनर्रचना करुन रेणापूर व चाकूर हे दोन तालूके अस्तित्वात आले. तसेच 23 जून 1999 रोजी पूर्वीच्या तालूक्याची पुनर्रचना करण्यात येवून देवणी, जळकोट व शिरुर अनंतपाळ हे तीन तालूके अस्तित्वात आले. सध्या लातूर जिल्ह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट व शिरुर अनंतपाळ असे दहा तालूके आहेत.

विषयाची निवड :

पंचायत राजसंस्थेत मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा माझा आवडता विषय आहे. मातंग समाजाची जवळीकता माझ्या जन्मापासून

आहे. एकंदरीत मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग त्यांच्या संस्थेच्या प्रमाणात कितपत आहे व इतर पैलूंचा अभ्यास करावा वाटतो म्हणून मी हा विषय निवडला.

समस्या सूत्रन :

मातंग समाजाच्या विकासाचा आढावा घेता वेगवेगळ्या स्तरावर मातंग समाज अनुसूचित जातीतील इतर जातीच्या तुलणेत संख्येच्या प्रमाणात मागासलेला व अनेक सोयी सवलतीपासून वंचित आहे. राजकीय सत्तेचा वाटा त्यांच्या पर्यंत पोहंचलेला नाही. किंवा त्यांना राजकीय सहभागात सामावून घेतले नाही. मोजके व्यक्ती वगळता मातंग समाजाची राजकीय उदासीनता वाढत आहे. राखीव जागेवरसुद्धा ते स्वेच्छेने सहभाग नोंदवत नाहीत अशी उदासीनता समाजाच्या दृष्टीने विकास साधू शकणार नाही. संपूर्ण दलित जातीतील एकंदर या जातीची स्थिती/स्थान काय आहे? शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक आरक्षणविषयक, पंचायतराज संस्थेमध्ये ग्राम पंचायत, पंचायत, जिल्हा परिषद यामध्ये राजकीय सहभाग,स्त्रीयांचा सहभाग, पुरुष व युवकांचा सहभाग त्यांची भूमिका/राजकीय पक्षाविषयी मातंग समाजाचे महत्व मतदानाविषयीचे मत, विविध संघटना यात मातंग समाजाचा सहभाग वाढावा. ग्रामीणस्थानी स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या कार्यशाळा आहेत. येथे नव्या पिढीचे भावी नेतृत्व उभे रहाते व ते नेते राजकीय, सामाजिक जीवनाच्या बाराखड्या याच कार्यशाळेत गिरवतात यामुळे लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाला एक राजकीय वारसा मिळावा व मातंग समाज हा राजकारणापासून विशेषतः युवक व युवती यांच्यात राजकीय रुची वाढवून त्यांचा सहभाग वाढवावा व समाजाचे नेतृत्व करणारी पिढी तयार व्हावी फक्त निवडणूकीपुरता यांचा वापर होवू नये तर राजकारणात

त्यांचा वाटा असावा कारण याच कार्यशाळेतून महाराष्ट्राचे नेते यशवंतराव चव्हाण, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे महाराष्ट्राला मिळाले आहेत.

संशोधनाचे महत्व :

लातूर जिल्ह्यातील मातंग समाज हा 70 टक्के पेक्षा जास्त ग्रामीण भागात राहतो. व पंचायतराज संस्थेची भूमिका ग्रामीण भागात अतिशय महत्वाची आहे. समाजजीवनाचा विकास व प्रगती या संस्थांच्या कार्यात्मक भूमिकेवर अवलंबून आहे. केंद्र व राज्य शासनाच्या दृष्टीने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकास योजना व राजकारणात सहभाग मिळवण्याची संधी पंचायतराज संस्थेच्या माध्यमातून मिळते. यादृष्टीने हा अभ्यास उपयुक्त ठरणार आहे.

तथ्य संकलन :

मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग पंचायत राजसंस्था लातूर जिल्हा या संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, तुलणात्मक, क्षेत्रीय पद्धतीचे तथ्य संकलन करावे लागणार आहे. यासाठी दोन तथ्य स्त्रोतांचा आधार घेता येतो.

1. प्राथमिक स्त्रोत - प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली या तंत्रा अंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत यावर मातंग समाजाचे निवडून आलेले सभासद जातीय संघटना महामंडळे, युवक व युवतीच्या मुलाखती घेणे नियोजीत आहे व त्यांच्यापासून तथ्य संकलन केले जाणार आहे.
2. द्वितीय स्त्रोत – या स्त्रोतात मातंग समाजातील पुस्तके संदर्भग्रंथ, साप्ताहिके, मासिके, वर्तमानपत्रे, आयोगाचे अहवाल इ. च्या आधारे तथ्याचे संकलन केले जाणार आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

1. पंचायतराज संस्थेचा मुळ हेतू व उद्देशासह समजून घेणे.
2. मातंग समाजाचा अभ्यास करणे.
3. पंचायतराज संस्थेत मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग जाणून घेणे.
4. लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाला आरक्षणाचा उपयोग कितपत झाला हे जाणून घेणे, आरक्षणातील स्वतंत्र आरक्षणाची गरज जाणून घेणे/स्थान.
5. मातंग समाजाची दिशा व दिशा रेखाटन.
6. मातंग समाजाची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
7. लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाला फुले-आंबेडकरी, शाहू विचारानी गरज यावर प्रकाश टाकणे.

गृहीतकृत्ये :

1. लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाचा पंचायतराच संस्थेतील राजकारणात त्यांच्या संख्येच्या प्रमाणात कमी जाणवतो त्यामुळे राजकीय रुची वाढवणे.
2. लातूर जिल्ह्यातील स्त्रीयांचे लक्ष चुल व मुल याकडे वेधले जाते.
3. लातूर जिल्ह्यातील मातंग समाजाच्या रुढी परंपरागत व्यवसायामध्ये रुची आहे, आरक्षणाचा हेतू साध्य झाला नाही.
4. राजकारणाचा वापर जातीसाठी होत नसून जातीचा वापर राजकारणासाठी होत आहे.

5. लातूर जिल्ह्यातील मातंग समाजात बेकारी, अशिक्षितपणा, दारिद्र्य वाढत आहे, शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेता येत नाही.

6. शाहू-फुले, आंबेडकर विचारापासून हा समाज दूर जात आहे.

प्रकरणाची मांडणी :

1. प्रकरण पहिले – प्रस्तावना
2. प्रकरण दुसरे - मातंग समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक स्थान (स्थिती)
3. प्रकरण तिसरे - मातंग समाज व आरक्षण.
4. मातंग समाजातील व्यक्तींचे योगदान (मातंग पक्ष व संघटनेत समाजाचे योगदान)
5. लातूर जिल्ह्यातील पंचायतराज संस्थेच्या राजकारणात मातंग समाजाचा सहभाग.
6. उपसंहार/निष्कर्ष/शिफारशी

टीप :- हा संशोधन कार्य आराखडा /प्राथमिक व स्थूल स्वरुपाचा आहे. यामध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल होवू शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची

1) खुशाल खडे - अक्षर नॅशनल बहुजन पब्लिकेशन, नागपूर

2) धनराज पवार - फुले, आंबेडकरी चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर.

3) डॉ. निळकंठ शेरे - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय, सुविधा प्रकाशन, पुणे, 149 शनिवार पेठ, पुणे.

4) डॉ.छाया निकम - दलित कथा, निर्मिती आणि समीक्षा, संकेत प्रकाशन, नागपूर

5) के. टी. उपदेशे - मातंग समाज, आयडिया पब्लिकेशन, औरंगाबाद.

6) चंद्रकांत वानखेडे - मातंग समाज आणि आंबेडकरवाद, सुविधा प्रकाशन, वर्धा.

7) मासिक - लहू शक्ती डि. 2012

8) प्रा.म.द.देशपांडे - आंबेडकरांचे र ाजकीय विचार, प्रकाश विश्वासराज लोड्.वामयगृह, मुंबई.

9) पंडित शेषराव नलावडे - सत्ताविकेंद्रिकरण आणि 73 वी संविधान दुरुस्ती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

10) डॉ.बा.भा. पाटील - पंचायतराज, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

11) अर्थ व सांख्यिक संचालनालय, महाराष्ट्र शासन जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

Dr.Ramesh R. Bainwad
Research Guide (Pol.Sci.)
Nutan Mahavidyalaya,Selu.

संशोधक

प्रा.डावरे वसंत रंगनाथ

कै.शंकरराव गुट्टे वरिष्ठ महाविद्यालय, धर्मापूरी

ता.परळी (वै.) जि. बीड

मार्गदर्शक

डॉ. रमेश रा. बैनवाड

नुतन महाविद्यालय, सेलू

ता. सेलू जि. परभणी

Filename: Daware Sir. Synopsis....
Directory: G:
Template: C:\Users\admin\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title:
Subject:
Author: siddhant A. Dhade
Keywords:
Comments:
Creation Date: 03-Jan-17 11:52:00 AM
Change Number: 2
Last Saved On: 03-Jan-17 11:52:00 AM
Last Saved By: admin
Total Editing Time: 0 Minutes
Last Printed On: 01-Jan-04 12:05:00 AM
As of Last Complete Printing
Number of Pages: 11
Number of Words: 2,470 (approx.)
Number of Characters: 14,079 (approx.)